# सातारा जिल्हा परिषद,सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२)२३८१२६ कार्यालय फॅक्स नं-: (०२१६२)२३०६०१
E-mail -: dyceogadstr@gmail.com

जा.क्र.साप्रवि/आस्था-२(५)कावि२५१/२०१९

दिनांक -: १५/०३/२०१९

**विषय -:** दिनांक १.१.२०१९ रोजीची जिल्हा सेवा वर्ग -३ सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), लघुलेखक उच्च व निम्न श्रेणी व लघुटंकलेखक यांची अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत..

**ज्ञा प न.**

या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.साप्रवि/ आस्था-२(५)/कावि-८८/२०१९, दि.१/२/२०१९ रोजीच्या ज्ञापनांनुसार लघुलेखक उच्च श्रेणी या संवर्गाची, तसेच ज्ञापन क्र.साप्रवि/ आस्था-२(५)/कावि-८७/२०१९, दि. १/२/२०१९ रोजीच्या ज्ञापनांनुसार सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), लघुलेखक निम्न श्रेणी व लघुटंकलेखक या संवर्गाची, दिनांक १/१/२०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेत आलेली होती. सदरची यादी महाराष्ट्र जिल्हा परिषदा (नेमणूका,जेष्ठता,पगार आणि भत्ते) नियम १९६२ मधील नियम ६ व महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठता विनियम) १९८२ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परिक्षा नियम १९८५ व (सुधारित) नियम १९९९ मधील मार्गदर्शक सुचनांचे आधारे तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही -२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११ नुसार तयार करण्यात आली होती. सदर सूचीवर कोणाचे काही आक्षेप असल्यास, त्यासाठी १५ दिवसांची विहीत मुदत दिलेली होती. सदर मुदतीमध्ये वर नमूद केलेल्या संवर्गाच्या तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूचीवर कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

सबब वरील तीन संवर्गाची दिनांक १/१/२०१८ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची व दिनांक १/१/२०१९ रोजीचे तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची एकत्रित करुन, दिनांक १/१/२०१९ रोजीची वरील ६ संवर्गाची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेत येत आहे. तरी सोबतची सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), लघुलेखक उच्च व निम्न श्रेणी व लघुटंकलेखक या संवर्गातील कर्मचारी यांची दिनांक १/१/२०१९ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची सर्व संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी.

१५/३/१९

**( सत्यजीत बडे )**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**जिल्हा परिषद सातारा.**

प्रति,

सर्व संबंधिताना त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत....

प्रत-: सर्व खातेप्रमुख, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत-: सर्व संबंधित कार्यालय -------------------------- यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत-: आस्थापना २(३)/१(२) सा.प्र.वि.जि.प.सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.